महिलांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : एक ऐतिहासीक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच डी पदवी साठीचा शोध प्रबंध आराखडा.

संशोधिका

सुलक्षणा किशनराव इंगोली

(एम.ए.बी.एड. पेट)

मार्गदर्शन

प्राचार्य डॉ. विठ्ठल व्ही. घुले

राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी

2021-2022

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

संशोधक विद्यार्थ्यांचे नांव	: सुलक्षणा किशनराव इंगोले (एम.ए.बी.एड. पेट)
विषयाचे नांव	: इतिहास
संशोधन विषयाचे शिर्षक	: महिलांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास
मोबाईल नंबर	: 9096701135
ई मेल आयडी	: sululicpbn@gmail.com
संवर्ग	: एस.सी. (S.C)
संशोधक मार्गदर्शक	: प्राचार्य डॉ. विठ्ठलराव व्ही. घुले राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी - 431401
मोबाईल नंबर	: 9511729490 / 9423452731
ई मेल आयडी	: vitthalghule711@gmail.com
संशोधन केंद्र	: ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

महिलांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास

विषय प्रवेश :

स्वातंत्र समता आणि बुंधुत्व या रास्त मागनीसाठी जगात अनेक अंदोलने, चळवळी झाल्या आहेत. निसर्गत ; स्त्रीयांचे स्वातंत्र आणि समानतेचे अधिकार पुरुषांनी हिरावून घेतल्याचे सर्वश्रुत आहे. भारतीय समाजही याला अपवाद नाही. भारत पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रीयांना समतेचा अधिकार नाकारला गेला. प्राचिण काळापासून स्त्रियांना गुलामीची वागणुक मिळत आली आहे. हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे पुरुषांची सेवा हाच तिचा खरा धर्म, असे तिच्या मनावर बिबंविले आहे.

भारतीय समाजात जातीयता, अस्पृश्यता, अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी प्रथा, परंपरा, वृत्तवैकल्य इ. वाईट निष्ठ चालीरिती अस्तित्वात होत्या. वर्ण व्यवस्थेने एका विशिष्ट वर्गालाच शिक्षणाचा हक्क बहाल केला होता. तर इतरांना त्यांची सेवा करावी अशी कामाची विभागणी करुन दिली होती. वर्ण व्यवस्थेच्या चौकटी बाहेर जाण्याची मुभा नव्हती त्यामुळे भारतीय समाजाची अधोगती झाली. प्राचिन काळापासून अधुनिक युगापर्यंत शुद्र आणि स्त्रियांना हालाखीचे जीवन जगावे लागले. इंग्रजांच्या आगमनाने भारतीय समाजाला सकारात्मक बदल पहावयास मिळतात उदा. लॉर्ड बेंन्टीगने सतीची चाल कायद्याने बंद केली. अधुनिक भारतात अनेक समाजसुधारक स्त्रियांच्या प्रश्नांना घेवून आवाज उठवत होते म्हणून अधुनिक भारतात राजाराम मोहन रॉय, महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहु महाराज, रानडे, कर्वे, आगरकर, वि. रा. शिंदे यासारखे थोर समाजसुधारक भारताला लाभले भारतामध्ये अनेक समाजसुधारक होऊन गेले आहेत. या थोर कृतिशिल समाजसुधारकाच्या परंपरेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रस्थानी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चरित्राचे अगनित पैलु आहेत म्हणून

मी ‘‘ महिलांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान: एक ऐतिहासीक अभ्यास’’ हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बालवयापासून भारतीय समाजातील समस्या जवळुन अनुभवल्या आहेत. शिक्षण घेत असतांना अस्पृश्य म्हणून मिळालेली वागणुक त्यांना सयाजीराव गायकवाड यांच्या राजदरबारातही नौकरी करतांना मिळत होती, उच्च विद्याविभुषित माणसाला एवढी हिन वागणुक मिळत होती तर ती अज्ञानी माणसाला किती अन्यायकारक असेल. या विषयी डॉ. बाबासाहेबांनी चिंतन मनन केले होते. जगाचे ज्ञान असलेल्या आंबेडकरांना भारतीय स्त्रियांबद्दल काही तरी करण्याची जिद्द होती. हे त्यांच्या प्रत्येक्ष कार्यातुन दिसुन येते.

‘केवळ चुल आणि मुल’ ही भारतीय समाज व्यवस्थेची विचारधारा विज्ञानवादी आंबेडकरांना मान्य नव्हती. कारण भारतात वर्णव्यवस्था शुद्र, अतिशुद्र आणि स्त्रिया यांच्यावर बंधने लादने आणि हिन्दु-धर्म शास्त्राप्रमाणे स्त्रीयांनी गुलामीचे जिवन जगावे लागले. समाजात जिवन जगतांना समान न्याय, वागणुक मिळाली तर समाजाचा पर्यायाने देशाचा विकास होईल ही आंबेडकररांची धारणा होती. म्हणून त्यांनी हिंदू धर्मातील अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा यावर घणाघाती हल्ले चढविले आणि त्यामुळे डॉ. आंबेडकर हिंदू विरोधी म्हणून प्रतिगामी कट्टरतावादद्यांनी बाबासाहेब केवळ अस्पृश्य समाजातील आहेत म्हणून त्यांची अव्हेलना केली.

डॉ. आंबेडकरांच्या स्त्रिविषयक कार्याचा ओझरता आढावा घेतला तर असे दिसून येते की, ते म्हणतात ‘‘कोणत्याही समाजाचे मुल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, यावरुन करता येते’’ समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत करणे

आवश्यक आहे. अशी त्यांची अग्रही भूमिका होती. ही समग्र प्रगती केवळ पुरुषांचीच नव्हे तर स्त्रियांची देखील होणे गरजेचे आहे हे मात्र त्यांना विद्यार्थी दशेतच ज्ञात झाले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजुर मंत्री असतांना खान कामगार स्त्रिला प्रस्तुती भत्ता, कोळसा खानीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरुषाइतकीच मजुरी, 21 दिवसांची किरकोळ रजा, एका महिण्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि 20 वर्षाची सेवा झाल्यावर निवृत्ती वेतनाची तरतुद यासारख्या महात्वाच्या निर्णयाचा उल्लेख करायला हवा. कामगार किंवा नौकरी करणाऱ्या स्त्रिला प्रस्तुती रजा मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील पहिले व्यक्ती आहेत. भारतानंतरच अनेक वर्षांनी इतर देशातील महिलांना प्रस्तुती रजा मंजूर झाल्या आहेत.

स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांच्या हक्का संबंधी हिंदू कोड बील संबंधीत मसुदा 28 फेब्रुवारी 1948 रोजी संसदेत मांडला गेला भारतातील सर्व जाती-धर्मातील स्त्रियांचा जाचक रुढी आणि परंपरापासून सुटका मिळावी यासाठी हा मसुदा लिहला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 4 वर्षे 1 महिना आणि 26 दिवस यावर काम करुन हे हिंदू कोड बील तयार केले. डॉ. आंबेडकर एक प्रख्यात वकिल होते. स्वतंत्र भारताचे कायदे मंत्री म्हणून त्यांनी हिंदू कोड बीलावर सुमारे 4 वर्षे काम केले. जाती व्यवस्थेत स्त्रियांना कमी लेखले जात आहे. त्यासाठी हिंदू कोडबिल बनवीले पाहिजे. ज्यामुळे देशातील सर्व स्त्रियांना समान अधिकार प्राप्त होईल.

सर्व जाती धर्माच्या स्त्रियांना समान न्याय हक्क मिळावा ही डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. भारतीय समाजातील स्त्रीयांना समान हक्क मिळावा म्हणून त्यांनी 1948 मध्ये संविधान सभेत ''हिंदू कोड बिल'' चा मसुदा प्रस्तुत केला त्यांनी आपल्या बिलामध्ये स्त्रियाना

घटस्फोटाचा अधिकार, विधवा आणि मुलींना संपत्ती मध्ये अधिकार, मृत्यूपत्र बनविले नसेल तरीही त्या व्यक्तिच्या संपत्तीत हक्क मिळावा स्त्री आणि पुरुषांना प्राप्त होणाऱ्या संपत्तीत कायद्याने वाटणी झाली पाहिजे. असा प्रस्ताव सादर केला.

या कायद्यानुसार मयत झालेल्यांच्या सर्व मुलांना आणि मुलींना समान वाटनिचे अधिकार देण्यात येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या या मसुद्याला कडाडुन विरोध झाला. पंडित नेहरु यांनी सुरुवातीला समर्थन केले मात्र, परिस्थितीनुसार त्यांनीही असमर्थता व्यक्त केली. सनातनी विचारांच्या नेत्यांना संविधान सभेत या बीलाला विरोध दर्शविला म्हणून डॉ. आंबेडकरांनी आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिला. पहिल्या लोकसभा निवडनुकीनंतर हे बिल लोकसभेत मंजूर करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नामुळे आज भारतीय स्त्रीयांना सन्मानाची वागणुक मिळत आहे. स्त्रियांना कायद्यासमोर समान वागणुक तिला न्याय मिळत आहे. ‘‘हिंदू कोड बिल’’ तेव्हा पारित झाले नसले, तरीही नंतरच्या काळात पारित होऊन स्त्रियांना वरदान प्राप्त झाले. बाबासाहेबांनी मसुद्यात समाविष्ठ केलेल्या बाबी विवाह, एकपत्नीत्व, घटस्फोट, महिलांना हक्क, वारसा हक्क कायदा इ. महत्वपूर्ण बाबींचा कायदा म्हणून असणारे बिल संमंत झाले नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या संदर्भात महत्वपुर्ण निर्णय आहेत. कामगारांना कारखान्यामध्ये खाणीमध्ये 18 तास काम करावे लागत असे. ते कामाचे तास 12 नंतर 8 तास असे केले. कामगारांचे बिघडत असणारे आरोग्य हे अधिक काम करणे हे मुळ कारण होते. हा त्यांचा निर्णय अतिशय महत्वपुर्ण आहे. स्त्रियांच्या हिताचे निर्णय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेले आपल्याला दिसतात. खाण कामगार स्त्रिला प्रस्तुती भत्ता,

कोळसा खाणी काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरूषा इतकीच मंजुरी 21 दिवसांची किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि 20 वर्षाची सेवा झाल्यावर निवृत्ती वेतनाची तरतुद या सारख्या महत्वाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली. कामगार किंवा नोकरी करणाऱ्या स्त्रिला प्रसुती रजा मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील पहिले व्यक्ती आहेत. भारता नंतरच अनेक वर्षानी इतर देशातील महिलांना प्रसुती रजा मंजुर झाल्या आहेत.

भारतीय घटनेचे शिल्पकार दलितांचे कैवारी, राजकारणी, अर्थतज्ञ, तत्वज्ञ इतिहासकार, कायदे पंडित, एक समाज सुधारक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या उन्नतीसाठी केलेले कार्य हे अनन्यसाधारण आहे म्हणून प्रस्तुत ठिकाणी मी "महिलाच्या उन्नतीसाठी "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान: एक ऐतिहासीक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला आहे".

विषय निवड व महत्व :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध पैलुवर संशोधन झालेले आहे. परंतु महिलांच्या उन्नतीसाठीचे योगदान यावर संशोधन होणे गरजेचे आहे व माझ्या माहितीप्रमाणे यावर संशोधन झालेले नाही म्हणूनच " महिलांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : एक ऐतिहासीक अभ्यास ". या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे. यासाठी हा विषय निवडला आहे.

विसाव्या शतकात इंग्रजांची राजवट भारतात स्थिरावली होती. प्रबोधन आणि पाश्चात्य ज्ञान घेवून तरूण समाज सुधारणेचे कार्य करीत होते. परिणामी समाज सुधारणा आणि

स्त्रियांच्या उन्नती विषयी बोलणारे समाज सुधारक भारतीय परंपरेत दिसतात. स्त्रियांसाठी कार्य करणारे समाजसुधारकही पहावयाच मिळतात परंतु भारतीय समाज सुधारकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे समाज सुधारक आहेत की, ज्यांच्या अध्ययनातुन, कृतीतुन समाज सुधारणेचा एकही घटक वगळला नाही असे वाटते. स्वतंत्र भारताचे कायादा मंत्री, घटनाकर्ते, अर्थतज्ञ, प्रख्यात वकिल, इतिहासकार अशा अनेक क्षेत्रात दैदिप्यमान किर्ती करणारे केवळ एकच महापुरूष आहेत. म्हणून या अष्टपैलु व्यक्तीमत्वाचे अनंत पैलु तर आहेतच परंतु संसदेत स्त्रियांच्या हक्कासाठी अहोरात्र मेहनत करून एक क्रांतीकारी ‘हिंदू कोड बिल’ मांडणारे बाबासाहेब आणि त्याला संमती मिळाली नाही म्हणून आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा देणारे व्यक्तीमत्वाचे उदाहरण जगाच्या इतिहासात दुर्मिळ आहे असे म्हणावे लागेल.

‘हिंदू कोड बिल’ असेल किंवा मजुर मंत्री असतांना कामगार स्त्रियांच्या हिताचे निर्णय घेणारे बाबासाहेब घटनेमध्ये, शोषीत, पिडीत, वंचित, दुबळे दलित स्त्रिया, शेतकरी इत्यादी उपेक्षित घटकांचा राज्यघटनेमध्ये सामाजिक न्याय देतांना दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक कर्ते समाज सुधारक म्हणून आपली भुमीका बजावतांना दिसतात. करीता उपरोक्त संशोधन विषयाला अधिक महत्व आहे.

संशोधन पध्दती :- प्रस्तुत ठिकाणी संशोधन हे ‘व्यक्तिविशेष’आहे. त्यामुळे संशोधन हे ‘वर्णनात्मक ’ विश्लेषणात्मक व घटनेचा अन्वयार्थक काढून केले जाईल.

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात येणार आहे. स्वत: डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेल्या ग्रंथाचा आधार घेण्यात येईल तसेच त्यांची भाषणे, आठवणी शासकीय, निमशासकीय पत्रलेखन इ. साधनांचा संदर्भ म्हणून उपयोग करण्यात येईल तसेच

इतर लेखकांची ग्रंथसंपदा, लेख, वृत्तपत्रे इ. दुय्यम सामग्री म्हणून तिचा संशोधनासाठी उपयोग करण्यात येणार आहे.

<u>समस्या सुत्रण</u> :-

प्राचिन काळापासुन भारतात पितृसत्ताक पध्दती असल्यामुळे स्त्रियांचा दर्जा हा निम्न होता. धार्मिक ग्रंथाच्या सुचने प्रमाणे पुरूषांनी आचरण करून स्त्रियांना गुलाम बनविले. त्यामुळे आधुनिक जगाच्या इतिहासाचा अभ्यास केल्या नंतर असे दिसते की, जग हे आधुनिकमध्ये असतांना भारतात मध्ययुग चालु होते, भारत हा जगात विकासाच्या दृष्टीने पिछाडीवर होता याचे प्रमुख कारण आपल्याकडे स्त्रि- पुरूष समानता केले गेले. अंधश्रध्दा रूढी परंपरेने महिलांना केशवपन बालविवाह, जरठविवाह, मुरली, जोगनी, देवदासी सर्व प्रथा या वाईट प्रथेमध्ये जिवन जगण्यास भाग पाडले.

इंग्रजाच्या आगमनाने सन 1757 साली भारतात आधुनिक युग सुरू झाले असे म्हणता येईल. पाश्चात्य शिक्षणात स्वातंत्र्य, समता, बंधूत्व हि तत्वे भारतीय समाजात रूजण्यास प्रारंभ झाल्याने समाज सुधारकांच्या परंपरा निर्माण झाल्या त्याच समाजसुधारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रस्थानी आहे. महिलांच्या उन्नतीसाठी त्यांच्या सामाजिक, धार्मीक, आर्थिक राजकिय स्वातंत्र्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी सभा, संमेलने, परिषदा, व्याख्याने आयोजीत केली. राज्यघटनेमध्ये स्त्रियांना सर्वांगीत विकासासाठी स्वातंत्र्य समता, न्याय बहाल केले. शासनात राहून स्त्रियांच्या हिताचे निर्णय घेतले वेळप्रसंगी राजीनामा दिली. अश्या प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या उन्नतीसाठी मौलीक योगदान दिले आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ अस्पृश्य समाजासाठी कार्य केले. हि सर्व भारतीयांची भावना बनलेली आहे. बाबासाहेबांचे अष्टपैलु व्यक्तीमत्व आहे. त्यांच्या कर्य कर्तृत्वाच्या दिशा- क्षितीचे हि विस्तीर्ण आहेत. सामान्य वाचक, संशोधक, आदीना डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांचे महिलांच्या उन्नतीसाठी जे कार्य आहे त्याची सखोल माहिती नाही. प्रस्तुत ठिकाणी हिच समन्या आहे. आज जी स्त्रि मान - सन्मान कायद्याच्या बळाने विकासांच्या सर्वोच्च शिखरावर पोहचली आहे. मग ती महिला कोणत्याही जातीची असो वा धर्माची, कोणत्याही देशाची असो भारतात राहणाऱ्या प्रत्येक महिलांच्या उन्नतीसाठी बाबासाहेबांचे कार्य अनमोल आहे. वाचकांचा, संशोधकांचा विचारवंताचा संभ्रम दुर करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांच्या महिला विषयक कार्याचा संशोधनात्मक आढावा घेणे आवश्यक आहे.

करीता मी “महिलांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासहोब आंबेडकरांचे योगदान एक ऐतिहासीक अभ्यास” हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उदिष्टये :-

1) अधुनिक भारतातील महिलांच्या सामाजिक दर्जाचा अभ्यास करणे.
2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्वांगीन कार्याचा आढावा घेणे.
3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या उन्नतीसाठी केलेल्या अंदोलनाचा अभ्यास करणे.
4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्री असतांनी स्त्रीविषयक केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
5) भारतीय राज्यघटनेतील स्त्रियांच्या उन्नती करीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या तरतुदीचा सखोल अभ्यास करणे.

संशोधनांची गृहितके :-

1) अधुनिक भारतातील महिलांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ व खालावलेला होता.
2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे क्षेत्र विस्तीर्ण व व्यापाक होते.

3) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महिलांच्या उन्नतीसाठी आंदोलने उभारली.
4) मंत्री असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेले निर्णय हे स्त्रियांचा दर्जा उंचवणारे होते.
5) भारतीय राज्यघटनेत महिलांच्या उन्नतीसाठी केलेल्या तरतुदीमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक स्त्री उध्दार कर्ते समाजसुधारक म्हणून सर्वश्रेष्ठ ठरतात.

संशोधनाच्या मर्यादा :- प्रस्तुत संशोधन हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा अढावा घेवून त्यांनी एकूनच स्त्रियांच्या उन्नतीसाठी विशेषता: हिंदू कोड बिला संदर्भात मांडणी करणारे आहेत. महिलांच्या समस्येसाठी त्यांनी उभारलेली अंदोलने आणि मंत्री म्हणून केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे. "महिलांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : एक ऐतिहासीक अभ्यास" या संशोधन शिर्षकाप्रमाणे संशोधन हे त्यांच्याशी निगडीत व कालमर्यादीत व स्थल निश्चितीप्रमाणे मर्यादीत राहिल.

माहितीचे संकलन :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीय साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक साधनांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथ, संबंधीत साहित्य, संसदेतील भाषणे, इतर भाषणे, लेख शासकीय, निमशासकीय, पत्रव्यवहार, चरित्र लेखन, आत्मचरित्र, परदेशी पत्र व्यवहार इत्यादी सामुग्रीचा आधार घेवून संशोधन केले जाणार आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्रांचे अनेक पैलु आहेत. त्यापैकी प्रस्तुत ठिकाणी एक मंत्री म्हणून संसदेत आपली ठाम भूमिका मांडणारा 'ससंद पटु' अशी

आहे. एक समाजसुधारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अधारित संशोधन साहित्य विपुल प्रमाणात आहे.

केंद्रशासनाने केलेल्या पत्रव्यवहार शासकीय भूमिका इत्यादी शासकीय स्वरुपावरुन बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करणारी ग्रंथ संपदा प्रकाशित होते. धनंजय कीर लिखित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन-चरित्र, कुबेर वा. ना. यांचा ग्रंथ, डॉ. आंबेडकर विचारमंथन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारतातील अग्रलेख-हा ग्रंथ गणवीर रत्नाकार यांचा आहे. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण कार्याचा आढावा घेणारा ग्रंथ गायकवाड यादव लिखित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन आणि कार्य हा महत्वपूर्ण ग्रंथ आहे. य. दी. फडके कृत आंबेडकरी चळवळ, ज. वि. पवार यांचा ग्रंथ भारतीय कॉंग्रेस आणि आंबेडकरी चळवळ, * डॉ. आंबेडकर शोसन रेव्होलुशन (इंग्रजी) या ग्रंथात डॉ. आंबेडकरांचे स्त्रीविषयक कार्य रेखाटले आहे. शंकरराव खरात यांचे ग्रंथरुपी लिखान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार, गाठाळ एस. एस. यांचे भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन हा ग्रंथ, गायकवाड प्रदिप यांचा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संमग्र भाषणे खंड-4, नरेंद्र जाधव यांचा ग्रंथ-बोल महामानवाचे इत्यादी संबंधीत संशोधनासाठी साहित्य आवलोकन करण्यात येईल.)

<u>प्रकरणाची रुपरेषा</u>

प्रकरण पहिले :

प्रस्तावना व संशोधनाचे पारूप:-

भारतीय समाज व्यवस्थेत पुरुषसत्ताक संस्कृत असल्यामुळे कुटूंब संस्थेत स्त्रियांचे स्थान दुय्यम दर्जाचे राहिले आहे. समाजातील वाईट चालिरीत प्रथा, परंपरा अंधश्रध्दा ह्या

अवितरपणे चालत राहिल्या आहेत. सनातनवाद्यांनी स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नाकारल्याने अज्ञानी स्त्रीयांना आपल्या स्वतंत्राची व हक्काची जाणीव होण्यास विसावे शतक उजाडले.

इंग्रजाच्या आगमनाने भारतातही समाज प्रबोधनाला प्रारंभ झाला समाजसुधारकांनी स्त्रियांना स्वतंत्र, समता मिळावी यासाठी प्रयत्न केले. राजाराम मोहन रॉय, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा फुले यासारख्या समाज सुधारकांच्या परंपरा निर्माण झाल्या. त्याच परंपरेतील कर्ते समाजसुधारक म्हणून डॉ. बाबासाहेबांचे कार्य अनन्य साधारण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांसाठी सभा घेतल्या त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. संसदेत स्त्रियांसाठी हिंदू कोडबील मांडले कामगार स्त्रिया गृहीणी या सर्व भारतीय महिलांच्या उन्नतीसाठी त्यांनी सर्वोतोपरी प्रयत्न केलेले दिसुन येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्त्रियांच्या पारतंत्र्याविषयी अधिक जाणीव होती हे घटनेतील स्त्रियांविषयीच्या तरतुदीवरून आपल्याला दिसुन येते. हिंदू कोडबिल मसुदा इतके महत्वपुर्व कार्य त्यांनी पार पाडले मजुरमंत्री असतांना महिलांच्या हिताचे महत्वपुर्ण निर्णय घेवून ते लागु केले.

महिलांच्या सर्वांगीन प्रगती कशी होईल यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांच्या कार्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

प्रकरण दुसरे :- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांच्या उन्नतीसाठी योगदान.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याच्या माध्यमातून स्त्री उन्नतीसाठी जे कार्य केले. ते ऐतिहासिक दृष्टया महत्वपूर्ण ठरले आहे. भारतीय स्त्रीवर लादलेली हजारो वर्षापासुनची आर्थिक, सामाजिक, धार्मिक गुलामगीरी कायद्याच्या माध्यमातुन नष्ट करण्यात आली. स्त्री-पुरुष यांच्यातील भेद नष्ट करुन समानतेचा अधिकार प्रधान करण्यात आला. कामगार

स्त्रीयांच्या वेतनाच्या संदर्भात हितसंवर्धनाचा सोयिचा मसुदा तयार केला. हे सर्व कार्य त्यांनी स्त्रीयांना उच्चपदस्थ करण्यासाठी केले. राज्यघटनेत स्त्रीविषयक कायद्याचा समावेश करण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेबांनी केला. केंद्रीय मंत्रीमंडळात मजुर मंत्री या पदावर असतांना गिरण्या, कारखाने इ. ठिकाणे कामे करणाऱ्या कामगार स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने वेतन मिळावे, स्त्रीयांना बाळंतपणाची रजा मिळावी कामगार स्त्रियांच्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी पाळणाघरे असावी, स्त्रीयांना पुरुषाबरोबर मतदानाचा अधिकार असावा डॉ. बाबासाहेबांनी असा सखोल विचार महिलाबाबत केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कायद्याच्या काही शाखाचे संहितीकरण व दुरुस्ती या संबंधी समितीचा अहवाल भारतीय घटना समितीस सन 1948 रोजी सादर केला. या अवालातील पुढील सात कायदे होते.

1) एखादा हिंदू व्यक्ति मृत्यूपत्र न करता मरण पावला असता मिळकती संबंधी ची हकदार स्त्री व पुरुष

2) मृताचा वारसदार ठरविण्याचा अधिकार

3) पोटगी

4) विवाह

5) घटस्फोट

6) दत्तक विधान

7) अज्ञान पालकत्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री असतांना आईला वडिलांच्या आधी उत्तराधिकारी बनविले दी हिंदू मॅरेज ॲक्ट अन्वये द्विभार्या प्रतिबंध कायदा निर्माण झाला. या कायद्यामुळे स्त्रीयांना मिळणारी वाईट वागणुकीवर प्रतिबंध लागला आहे. महिलांचे जिवन सुरक्षित झाले आहे. पहिली पत्नी हयात असतांना दुसरी पत्नी करणे कायदेशीर गुन्हा ठरणार त्यामुळे तिच्या जिवनाला सुरक्षितता लाभली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेलया वारसा कायद्यामुळे महिलांना वारसा हक्क प्राप्त झाला. त्यामुळे तिची कुटूंबात पत वाढल्याने तिला सन्मान प्राप्त झाला आहे. तिचा आत्मसन्मान वाढला आणि स्वाभिमान जपला आहे. तिचे मनोबल वाढले आहे. याची झलक प्रत्येक क्षेत्रात दिसून येते. याचाच परिणाम म्हणून महिला प्रत्येक क्षेत्रात आग्रेसर बनल्या आहेत, म्हणून महिलांच्या उन्नतीसाठी सर्वांगीन विकास करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर खरे महिलांचे कैवारी ठरले आहेत या संदर्भने प्रस्तुत प्रकरणात अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण तिसरे :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आंदोलने आणि स्त्रियांचा सहभाग:

ज्या अस्पृश्य समाजाला सामाजीक, धार्मीक, आर्थिक, शैक्षणिक जिवनात बहिष्कृत करण्यात आले होते. त्याच्या उध्दारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक आंदोलने केली आहेत. त्याच्या सोबत अंदोलनात सहभागी होणाऱ्या महिलांचे प्रमाण लक्षणीय होते. महाड चवदार तळ्याचा ऐतिहासीक सत्याग्रहात महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. महाडला जी परिषद संपन्न झाली त्यामध्ये पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांनी सहभाग घेतला होता. बाबासाहेबांनी दिलेली शिकवण स्त्रियांनी अंगीकारली ही महाडच्या परिषदेची फार मोठी फलश्रुती होती.

नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रहात मोठ्या संख्येने स्त्रियांनी सहभाग नोंदविला. तर 20 जुलै 1942 ला नागपुर या ठिकाणी महिला परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संबोधीत केले. या परिषदेसाठी 25 हजार महिलांनी सहभाग घेतला होता. अशा विविध आंदोलनात महिलांचा सहभाग हा लक्षणिय होता असे दिसुन येते.

प्रकरण चौथे :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार मंत्री असतांना स्त्रियांच्या उन्नतीसाठी विषयक कार्य :

भारतीय महिलांना सामाजिक न्याय मिळावा. तसेच प्रत्येक क्षेत्रात महिलांना समान वागणुक मिळावी ही बाबासाहेबांची तळमळ होती. कामगार मंत्री असतांना कामगार स्त्रियांना समान वेतन, कामाचे तास कमी, प्रस्तुती रजा श्रम कागकारांना विशेष सुविध, स्तनपान गृह इत्यादी गदत्वाचे निर्णय बाबासाहेबांनी घेतले आहेत. पुरूषांच्या खांद्याला लावुन चालणाऱ्या महिलांना सन्मान मिळाला पाहिजे. तशी बाबासाहेबांची विचारसरणी त्यांच्या कार्यकर्तृत्वातुन दिसुन येते. महिलांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरण पाचवे :-

हिंदू कोड बिलातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य :

स्वतंत्र भारताचे पाहिले कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांच्या हक्का संबंधी हिंदू कोडबील संबंधीत मसुदा 28 फेब्रुवारी 1948 रोजी संसदेत मांडला गेला. भारतातील सर्व जाती - धर्मातील स्त्रियांच्या जाचक रूढी आणि परंपरापासुन सुटका मिळावी

यासाठी हा मसुदा लिहला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 4 वर्ष 1 महिना आणि 26 दिवस यावर काम करून हे हिंदू कोड बील तयार केले.

सर्व जाती धर्माच्या स्त्रियांना समान न्याय हक्क मिळावा ही डॉ. आंबेडकरांची भुमीका होती. त्याकरीता त्यांनी 1948 मध्ये संविधन सभेत हिंदू कोडबिल चा मसुदा प्रस्तुत केला गेला. त्यांनी आपल्या बिलामध्ये स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार, विधवा आणि मुलींना संपत्तीमध्ये अधिकार मृत्युपत्र बनविले नसेल तरीही त्या व्यक्तीच्या संपत्तीत हक्क मिळावा स्त्री आणि पुरूषंना प्राप्त होणाऱ्या संपत्ती कायद्याने वाटणी झाली पाहिजे असा प्रस्ताव सादर केला.

प्रकरण सहावे :-

भारतीय राज्यघटनेतील स्त्रियांच्या उन्नती विषयक तरतुदी :

भारतीय समाजात समता प्रस्थापित व्हावी, प्रत्येकाला न्याय मिळाला पाहिजे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विशेष तरतुद केलेल्या आहेत. महिलांना पुरूषासमान अधिकार मिळावे. कुटूंबात तिचा सन्मान व्हावा, तिला सर्व प्रकारचे स्वतंत्र असावे, तिला शिक्षण घेता यावे, संपत्ती विषयक अधिकार, अशा अनेक तरतुदी बाबासाहेबांनी राज्यघटनेत केल्या आहेत. अंधश्रध्दा परंपरा ज्या स्त्रियांना गुलामीचे जिवन जगण्यास भाग पाडतात अशा क्रुप प्रथेचे समुळा उच्चाटन त्यांनी कायद्याच्या माध्यमातुन केले आहे.

उदाहरणार्थ :- मुरळी देवदासी इत्यादी वाईट प्रथा कायद्याने बंद करण्यात आल्या आहेत.

स्त्रियांच्या उन्नतीसाठी आवश्यक तरतुदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत केल्या आहेत. त्यांचा सखोल अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण सातवे :-

समारोप व निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणात उपरोक्त वरील प्रकरणाचा सारांश घेवून निष्कर्ष मांडण्यात येतील यामध्ये स्त्रीयांचा ऐतिहासीक दर्जाचा आढावा घेवून बाबासाहेबांच्या व्यक्तीमत्वाच्या पैलुचा आढावा घेवून त्यांची आंदोलने, त्यांची मंत्रीपदाची कामगीरी, राज्यघटनेतील त्यांचे कार्य कृतत्व आणि भारतीय महिलांच्या उन्नतीसाठी त्यांचे प्रयत्न यांचा सारांश रूपाने धावता आढावा घेण्यात येईल.

*** संदर्भ ग्रंथ सूची ***

1) Ambedkar B. R. What Congress and Gandi have done to the untouchable, 1945

2) Ambedkar B. R., who were shudras, Bombay 1992

3) बहिष्कृत भारत (लेख) 23 डिसेंबर 1927 अंक 19-20-21 वा अंक

4) आंबेडकर बी. आर. माझी आत्मकथा, आनंद प्रकाशन, औरंगाबाद

5) आंबेडकर बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे (जाती व्यवस्थेचे निर्मुलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन)

6) मालु केदारनाथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदिय कार्य, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.

7) डाहाट धनराज (संपा) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार, संकेत प्रकाशन 01 जानेवारी 2016

8) धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉप्युलर प्रकाशन मुंबई-1966

9) निकम गौतम ज्ञानदिप डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विमलकार्ती प्रकाशन चाळीसगाव-2016

10) Jadhav Nerendra, Dr. Ambedkar economic thought and Philosophy Popular Prakashan, Bombay, 1992

11) ‘‘Philosophy of Hindusism, an Essay’’ vasant moon (Edit) Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches, val 3, Bombay : Edu. Dept, Govt. of Maharashtra 1987

12) सुर्या अनिल, प्राचिन-अर्वाचिन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल सुगावा प्रकाशन पुणे-2010

13) पानसरे गोविंद, धर्म, जात, वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा, श्रमीक प्रतिष्ठाण, कोल्हापूर मार्च 2012

14) भारताचे संविधान, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने प्रकाशित हुकुम मुद्रीत, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद-2012

15) मुन मीनाक्षी, फुले आंबेडकरी स्त्री चळवळ, समता प्रकाशन, नागपूर-2002

16) पवार उर्मिला आम्हीही इतिहास घडवला (आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचा सहभाग) सुगावा प्रकाशन, पुणे एप्रिल-2004

17) पानतावणे गंगाधर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन ग्रंथ, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद 2004

18) ज.वि. पवार : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेत्ता प्रकाशन, मुंबई 26 जुन 2013

19) शंकरराव खरात : (संपा) डॉ. बाबासाहेबांनी पत्रे इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे 3 फेब्रुवारी 2014

20) हरि नरके : (संपा) महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, 2006

21) डॉ. लाजेवार ज्योती : फुले आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन, नागपुर आवृ. ऑक्टोंबर 2008.

22) ज.वि. पवार : भारतीय संविधानाची ओळख, आस्मिता कम्युनिकेशन, मुंबई 26 जानेवारी 2016

23) श्री. धनंजय कीर / मालशे फडके : महात्मा फुले समग्र वाङ्‌मय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1969

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. विठ्ठलराव घुले
राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी

संशोधिका

प्रा. सुलक्षणा किशनराव इंगोले
(एम. ए. पेट)